Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# अनाथांची आई : सिंधुताई

**प्रा. कविता भिकाजी पाटील,** बहिणाबाई महिला शिक्षणशास्त्र, महाविद्यालय नाशिक

**प्रस्तावना**

अनाथ हा शब्द कानावर जरी आला कि सिंधुताई सपकाळ यांची आठवण आल्या शिवाय राहत नाही. ज्यांनी आपल अख्ख आयुष्य गरजू व अनाथांची काळजी घेण्यातवाहिलं. ज्यांना अख्ख महाराष्ट्र "अनाथांची आई" म्हणून आजही ओळखतो अशा महान माई सिंधुताई सपकाळ यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९४८ ला वर्धा जिल्ह्यातील पिंप्री मेघे या गावात झाला.

सिंधुताई सपकाळ यांचा जन्म एका सर्वसामान्य गुरख्यांच्या घरी झाला त्यांचा वडिलांचे अभिमन्यू साठे असे होते. अभिमन्यू साठे हे पेशाने गुराखी असल्याने ते रोज गुर,ढोर चारण्यासाठी नेत असत. ते निरक्षर असूनही त्यांना शिक्षणाची प्रचंड आवड होती. आपल्या मुलीने चांगल शिकावं आणि मोठ व्हावं असं त्यांना नेहमी वाटत असे. परंतु सिंधुताई सपकाळ यांचा आईचा त्यांच्या शिक्षणास विरोध होता. त्याचे कारण असे कि, अगोदरच परिस्थिती बेताची तात मुलीचं शिक्षण म्हणजे खर्च वाढणारच म्हणून त्या सिंधू ताईना शाळेत जाऊ देत नसट. परंतु त्यांचे वडील सिंधुताई यांना आपल्या मदतीला म्हणून न्यायचे आणि त्यांना गुपचूप शाळेत पाठवायचे. असं रडत-पडत का होईना त्या इयत्ता चौथी पर्यंत शिकल्या परस्थिती नाजूक असल्याने त्यांना अंगात घालायला बालपणी निटसे कपडे पण नव्हते फाटक्या कपड्यांचे चिंध्यांनी शिवलेले कपडे त्या घालत असत. त्या मुळे सर्व लोक सिंधुताईना "चिंधी" म्हणून चिडवत असत हेच त्याचं टोपण नाव पडल. शिक्षण बंद झाल्यावर घरची सर्व कामे त्या करू लागल्या त्या काळी लहान वयातच मुलींचे लग्न करण्याची रीत होती त्यामुळे सिंधुताई सपकाळ त्यांचा विवाह देखील वयाच्या अगदी ९ व्या वर्षी त्यांच्या पेक्षा २६ वर्षांनी मोठ्या असलेल्या श्रीहरी सपकाळ यांच्याशी झाला.

**सिंधुताई सपकाळ यांचे वैवाहिक जीवन**

सिंधुताई सपकाळ यांचे वैवाहिक आयुष्य म्हणजे त्यांच्या साठी सर्वात मोठा संघर्ष म्हणावा लागेल. त्यांचे लग्न झाल्यावर त्यांना शिक्षण घेता आलं नाही. त्यांना वाचण्यची आवड होती. म्हणून त्या रानात गोवऱ्या वेचताना सापडलेली कागदाची तुकडे त्या घरी आणून लपून ठेवत. आणि वेळ भेटला कि अभ्यास करत, वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत माईची जवळपास तीन बाळंतपण झाली. माईच्या आयुष्यात त्यांना प्रचंड सासुरवास सहन करावा लागला. राब – राब राबुन सुद्धा पदरी काहीचं पडलं नाही. त्याचं लग्न हे फार काल टिकलं नाही वयाच्या २० व्या वर्षी त्यांना श्रीहरी सपकाळ यांनी टाकून दिलं.

वयाच्या अगदी कमी वयात त्यांना अनेक संघर्ष करावे लागले. त्यातला पाहिला संघर्ष असा "माई" जेव्हा चौथ्या वेळेस गर्भवती होत्या. तेव्ह्या गुऱ्हे वळणे त्यांचे शेन कडणे असी कामे त्यांना करावी लागतं. हजारो जनावर सांभाळून त्याचं शेन काढून महिलांचे कंबरडे मोडले तरीही त्यांना एक रुपयाही मजुरी मिळत नसे. त्याकाळात त्या सेणाचा लिलाव तिथले वनरक्षक अधिकारी करत असत. या जाचाल कंटाळून अखेर सिंधुताईनी त्यांच्या विरोधात बंड पुकारले. नंतर त्यांना या लढ्यात त्यांना यश आले. परंतु या बंडाची प्रचंड मोठी किंमत त्यांना पुढे चुकवावी लागली. सिंधुताई सपकाळ यांना यातून अल्पसा मोबदला मिळायचा त्यामुळे तिथल्या एका जमीनदाराची वन अधिकाऱ्याकडून येणारी रक्कम बंद झाली.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

याचं जमीन दाराने सिंधुताई सपकाळ यांच्या पोटातील मुल माझ आहे, असा अपप्रचार केला. याचं खोट्या माहितीवर विश्वास ठेऊन आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत माईच्या नवऱ्याने त्यांना मारहाण करून बाहेर हाकलून दिले. जनावरांच्या तुडव्याने त्या मारून जाव्या म्हणून त्यांना गोठ्यात डांबल. सिंधू ताईंचे दिवस भरत आले होते. म्हणून त्यांनी गोठयातच आपल्या मुलीला जन्म दिला. नंतर मुलीचं संगोपन अशा अवस्थेत कसं करावं म्हणून त्या माहेरी गेल्या. परंतु त्यांच्या आईनेही तिथे राहण्यास नकार दिला. गावकऱ्यांनी देखील त्यांना मारहाण करून गावा बाहेर हाकलून दिले.

असा कठीण प्रसंग आयुष्यात आल्याने काय करावं हे त्यांना सुचत नव्हत. अशा या अवगडलेल्या अवस्थेत काम कस करावं म्हणून त्या परभणी मनमाड रेल्वे स्टेशनवर भिक मागून आपला उदरनिर्वाह चालवत होत्या. कुणी भाकर तुकडा दिला तोच खायचा. रेल्वे स्टेशनवर एखादा अर्ध फळ कुणी फेकून दिल तर तेच खायचं अशा या जीवनाला कंटाळून शेवटी मरावं असं त्यांना वाटू लागल एकदा त्यांनी जळगाव येथील पिंप्राळा रेल्वे स्टेशनवर रेल्वे खाली जाऊन जीव देण्याचा प्रयत्न देखील केला. परंतु लहानग्या मुलीचा विचार करून त्या पुन्हा सावरल्या. त्यांचा पुन्हा तोच दिनक्रम सुरु झाला त्यांनी. मागितलेली भिक देखील त्या सर्व भिकारी लोकांना द्यायच्या. सर्वांना जवळ घेऊन एकत्र काला करून त्या खात असत. पुढे कधी-कधी दोन-तीन दिवस सुद्धा काहीच मिळत नसे म्हणून सिंधुताई सपकाळ यांनी शेवटी स्मशान भूमीकडे वाटचाल केली आणि तिथे काही दिवस काढले.

**सिंधुताई सपकाळ यांचे सामाजिक कार्य**

माईंच्या आयुष्यात त्यांना पदोपदी संघर्ष करावा लागला. खरतर अशा अवस्थेत जीवन जगणं ही काही सामान्य गोष्ट नव्हती. त्यांचा दृष्टीकोन हा सर्व अनाथ मुलांचा सांभाळ करण्याचा होता. आपल्या होत आलेल्या हाल अपेष्टा पाहून आपल्या मुलीच्या वाटेला ते येऊ नये म्हणून त्यांनी आपली मुलगी ममता ला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी पाठवले. सर्व अनाथ मुलांना शिक्षण मिळावं म्हणून त्यांनी इ.स.१९९४ ला पुणे जिल्हातील पुरंदर तालुक्यात "कुंभार वळण" या गावात ममता बाल सदन 'या नावाने संस्था सुरु केली या संस्थे मार्फत आणत मुलांना योग्य शिक्षण सुरु केली. या संस्थे मार्फत अनाथ मुलांना योग्य शिक्षण, राहण्याची सोय, जेवणाची सोय, शालेय साहित्य ई. देऊन त्यांना त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे केलं जात नंतर नोकरी मिळाल्यावर योग्य जोडीदार शोधून त्याचं लग्न व्यवस्थित रित्या पार पडायची जीमेदारी देखील संस्था पार पाडते. या संस्थेत जवळपास १००० पेक्षा अधिक अनाथ मुलांना आजवर शिक्षण मिळालं असुन त्यांच्या आयुष्याला इथूनच एक नवीन दिशा मिळाली.

सिंधुताई सपकाळ यांनी अन्य काही संस्था स्थापन केल्या. त्यात सावित्रीबाई फुले मुलींचे वस्तीगृह (चिखलदरा), गोपिका गाई रक्षण केंद्र (वर्धा), अभिमान बाल भवन (वर्धा), ममता बाल सदन, (सासवड), सप्तसिंधू महिला आधार बाल संगोपन व शिक्षण संस्था (पुणे), बाळ निकेतन हडपसर (पुणे), इ. या सर्व संस्था सुरळीत चालत राहाव्या म्हणून त्यांनी अनेक प्रयत्न केले. संस्थेच्या कामकाजासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून त्यांनी अनेक प्रदेश दौरे केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या वकृत्वाने त्यांनी समाजाला प्रभावित केले. परदेशातून सुद्धा संस्थेसाठी अनुदान उपलब्ध व्हावे म्हणून सिंधू ताईनी "मदार ग्लोबल फाऊडेशन " या संस्थेची स्थापना केली.

**सिंधुताई सपकाळ यांचा सन्मान**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

सिंधूताईच्या महान कार्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. माईच्या आयुष्याच्या कारकिर्दीत ७५० पेक्षा अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

**त्यांना मिळाले काही निवडक पुरस्कार**

- पद्मश्री पुरस्कार (२०२१)
- महाराष्ट्र शासन अंतर्गत देण्यात येणार डॉ. बाबासाहेब आंबेकर समाज भुषण पुरस्कार (२०१२)
- महाराष्ट्र शासन अंतर्गत देण्यात येणार “अहिल्याबाई होळकर पुरस्कार” (२०१०)
- शिवलीला महिला गौरव पुरस्कार
- मूर्तिमंत आईसाठी चा पुरस्कार (२०१३)

**सिंधुताई सपकाळ यांचे निधन**

सिंधुताई सपकाळ यांनी त्याचं अख्ख अनाथ मुलांच्या सेवेत घालवलं. त्यांना आजही “अनाथांची माय” म्हणून ओळखलं जातं. आशा या माईच्या आयुष्यातला शेवटचा दिवस ४ जानेवारी २०२२ हा ठरला. या दिवशी गलॅक्सी हॉस्पिटल पुणे येथे हृदय विकाराने त्यांचा मृत्यू झाला. त्या आधी एक महिन्यापूर्वी त्यांचे हार्नियाचे ऑपरेशन झाले होते. गेली ५ वर्षापासून जडलेल्या आजाराने त्यांचे डाव्या बाजूचे फुफ्फुस सुरळीत चालत नव्हते. सर्जरी नंतर त्यांची तब्येत बरी झाली होती परंतु काही दिवसांत फुफ्फुसाचे संतुलन बिघडले आणि त्यांची प्रकृती गंभीर झाल्याने दिनांक ४ जानेवारी २०२२ रोजी रात्री ८ वाजून १० मिनिटांनी त्यांची प्राण ज्योत मावळली.

**सारांश**

यंत्र नार्यस्तु उज्जेन ते पूज्यंते

याचा अर्थ जिथे स्त्रियांची पुजा केली जाते तिथे देवतांचा वास असतो.

सिंधुताई सपकाळ यांच्या जिवनातिल संघर्ष आणि कार्य सर्वांसाठी एक प्रेरणा आहे .त्यांनी केवळ समाजातील वंचित वर्गासाठी काम केले नाही तर प्रत्येक माणसाच्या हृद्यात एक सकारात्मक बळाव घडून आणला .त्यांनी अनाथांची माऊली म्हणून समाजात आपली ओळख निर्माण केली .त्यांची आजही स्मृती जिवंत आहे आणि त्यांच्या कार्याचा आदर्श समाजाला मार्गदर्शन देत आहे .

**संदर्भग्रंथ**

1. http://operthemagazine.com
2. http://mr.wikpedia.org
3. जगावे तर असे - सिंधुताई सपकाळ, - जितेंद्र इंगळे - नभ प्रकाशन
4. अनाथांची आई - डी. बी. महाजन, (२०१७) तीर्थरूप पब्लिकेशन्स
5. मी वनवासी : सिंधुताई सपकाळ, (२०१३) रिया पब्लिकेशन्स कोल्हापूर


Copyright © | JET Network, All Rights Reserved